अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail :
addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक २६/०९/२०२३
-: प्रेसनोट :-

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ३१/२०२३ |
| ३ | कलम | कलम ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | १) श्री अमर विजयकुमार सोनावणे, वय ४२ वर्षे, धंदा - नोकरी, कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, २ रा माळा, आरोग्य भवन, मुंबई ४०० ००१.<br>रा.ठि. सी-२२०५, सेन्ट्रीओ अर्पाटमेंट, गौतमनगर जवळ, पी.एल. लोखंडे मार्ग, गोवंडी प. मुंबई ४३<br>२) (खाजगी इसम) राजु युसुफ शेख, वय ५१ वर्षे, धंदा - कॉन्ट्रॅक्टर, रा.ठि. मोखाडा पोस्ट ऑफिस शेजारी, ता. मोखाडा, जि. पालघर. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,५०,०००/- |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | खाजगी इसम याने रुपये १,५०,०००/- स्विकारली. |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रुपये १,५०,०००/- |
| ८ | थोडक्यात हकीगत | तक्रारदार हे सिव्हील कॉन्ट्रक्टर असुन त्यांनी सुशिक्षित बेरोजगार योजने अंतर्गत नॅशनल हेल्थ मिशन अंतर्गत येणारी कामे करण्यासाठी आवश्यक असणारा परवाना मिळविण्याकरीता त्यांनी कार्यकारी अभियंता, पायाभूत सुविधा विकास कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, २ रा माळा, आरोग्य भवन, मुंबई यांचे कार्यालयात रितसर शासकिय फी भरून अर्ज केला होता. तक्रारदार यांचे परवानाचे काम लोकसेवक यांचे कार्यालयात प्रलंबित होते.<br>दि. ०६/०९/२०२३ रोजी तक्रारदार हे त्यांचे परवानाचे कामाचे कागदपत्रांची पुर्तता करून लोकसेवक यांचे कार्यालयात त्यांचे कामासंदर्भात भेटले असता लोकसेवक यांनी सुशिक्षित बेरोजगार योजने अंतर्गत आवश्यक असणारा कॉन्ट्रॅक्टर परवाना देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रू. १,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार रूपये) लाचेची मागणी केली.<br>तक्रारदार यांना लोकसेवकांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ११/०९/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लेखी तक्रार दिली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १२/०९/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून रू. १,५०,०००/-(एक लाख पन्नास हजार रूपये) इतक्या लाचेच्या रकमेची पंचासमक्ष मागणी केल्याचे निष्पन्न झाले<br>त्याप्रमाणे आज दि. २६/०९/२०२३ रोजी रचण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना खाजगी इसमाकडे लाचेची रक्कम रू. १,५०,०००/-(एक लाख पन्नास हजार रूपये) देण्यास सांगितल्याने लाचेची रक्कम रू. १,५०,०००/-(एक लाख पन्नास हजार रूपये) ही खाजगी इसमाकडे दिली असता खाजगी इसमास रंगेहात पकडण्यात आले. तसेच लोकसेवक यांना देखील ताब्यात घेवुन त्यांचे विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला. |

ASSTT. COMMISSIONER OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU

(नितीन दळवी)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ - acbmaharastra.gov.in
ईमेल - १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज - www.acbmaharastra.net., टोल फ्रि. क्र. १०६४ दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००